(2)

टेंडर फॉर्म-फी वा बयाणा
रकमेत सूट न देण्या बाबत.

परिपत्रक

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही यंत्रसामुग्री उत्पादक हे ते सिंगल पॉईंट स्किम अंतर्गत लघुउद्योगांआंतर्गत नोंदणीकृत असल्याने निवीदा फॉर्म किंमत न भरता फॉर्म घेतात. तसेच निविदा सोबत कोणतीही बयाणा रक्कम भरीत नाहीत. यासाठी केंद्र शासनाच्या परिपत्रक क्र. एस एम आय(पी) - 3(11)/84 दि.31.5.84 चा आधार घेतला जातो.

वास्तविक सदर योजना ही फक्त केंद्र वा राज्य शासनाच्या खरेदीसाठी मर्यादीत आहे. याचा सहकारी साखर कारखान्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी सवलत देण्याचा काहीही संबंध नाही.

तरी निविदा फॉर्म किंमतीमध्ये वा बयाणा रकमेमधे या पुढे कोणाही यंत्रसामुग्री उत्पादकास कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात येवू नये, व या बाबत आपल्या वैयक्तिक पातळीवर दक्षता घेण्यात यावी. तसेच यापूर्वी याबाबत या कार्यालयाने काही परिपत्रके वा पत्रे वितरीत केली असल्यास ती रद्द समजण्यांत यावीत.

(सही)
साखर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, पुणे - 42.

१०४३
जा.क्र.साआ/कक्ष-15/निविदासुट/98
साखर आयुक्तालय, स्वारगेट, पुणे - 42.
दिनांक - 23.4.98.

प्रती -कार्यकारी संचालक,
स.....का.मर्यादित,
ता. जि.
यांना माहितीसाठी व कार्यवाहीस्वत रवाना.

प्रत - सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीस्वत रवाना.
प्रत - सर्व विशेष लेखा परिक्षक यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

द्वितीय ...
सहकारी संस्था ...
आवक क्रमांक ... ६४
... २।५।९८